तरुण भारत
Purva Vidarbha | 2025-07-06 | Page- 11
epaper.tarunbharat.net

# विद्यार्थ्यांची क्लब ऑफिसर्स म्हणून निवड

**◆ भंडारा, ५ जुलै**

जे. एम. पटेल महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र विभागातील चार विद्यार्थ्यांची क्विक हिल फाऊंडेशनच्या वतीने राबविलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या अभियानासाठी क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली.

वृषांक लांडगे याची प्रेसिडेंट, जय धनरेची सेक्रेटरी, उत्कर्ष गणवीरची ॲक्टिव्हिटी डायरेक्टर, विजय लांजेवारची पी. आर. मेडिया डायरेक्टर म्हणून निवड केली आहे. या विद्यार्थ्यांचे ट्रेनिंग व ओरिएंटेशन विमाननगर पुणे येथील क्विक हिल कंपनीच्या कार्यालयात २ जुलैला झाले. अजय शिर्के व गायत्री पवार यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे, त्यावरील उपाय व सायबर सुरक्षेची माहिती दिली. तसेच शाळा-महाविद्यालयांमध्ये मोहीम कशी राबवावी, याचे मार्गदर्शन केले.



क्लब ऑफिसर्स म्हणून निवड झालेले विद्यार्थी

सायबर सुरक्षा उपक्रमाचे हे चवथे वर्षे आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना विविध शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी जाऊन सायबर सुरक्षेबाबत प्रात्यक्षिकांसह माहिती सादर करण्याची संधी मिळणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना 'कमवा आणि शिका' या माध्यमातून आर्थिक मदतही होणार आहे. प्रभारी प्राचार्य डॉ. प्रदीप मेश्राम यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना अभियान सक्षमपणे राबविण्यासाठी मार्गदर्शन करून अभिनंदन केले. यशस्वितेसाठी विभागप्रमुख डॉ. प्रवीण घोसेकर, संगणक विभागाचे प्राध्यापक डॉ. सबाह नसीम, प्रा. पलाश फेद्देवार, प्रियांका शर्मा, प्रा. फरीना शेख यांनी सहकार्य केले.

◀ *(तभा वृत्तसेवा)*

Powered by Bharati Web